Vol 6 Issue 6 Dec 2016

ISSN No :2231-5063

# International Multidisciplinary Research Journal

# Golden Research Thoughts

Chief Editor
Dr.Tukaram Narayan Shinde

Publisher
Mrs.Laxmi Ashok Yakkaldevi

Associate Editor
Dr.Rajani Dalvi

Honorary
Mr.Ashok Yakkaldevi

**Welcome to GRT**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2231-5063**

Golden Research Thoughts Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial board.Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

**Regional Editor**

Dr. T. Manichander

## *International Advisory Board*

Kamani Perera
Regional Center For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus PopPhD, Partium Christian University, Oradea,Romania

Mohammad Hailat
Dept. of Mathematical Sciences, University of South Carolina Aiken

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences Al. I. Cuza University, Iasi

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Dept of Chemistry, Lahore University of Management Sciences[PK]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

......More

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University,Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University,Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary,Play India Play,Meerut(U.P.)

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh,
Vikram University, Ujjain

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU,Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra
Maulana Azad National Urdu University

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.aygrt.isrj.org**

GRT Golden Research Thoughts

ISSN: 2231-5063 Impact Factor : 4.6052(UIF) Volume - 6 | Issue - 6 | December - 2016

# एकल व सांघिक खेळ खेळणाऱ्या खेळाडूंच्या राशींच्या आधारावर व्यक्तिमत्वाचे तुलनात्मक अध्ययन

डॉ. अजय करकरे[1] , संजय कडूसकर[2]
[1]प्राचार्य, राणी लक्ष्मीबाई महिला महाविद्यालय, सांवरगांव नागपूर.
[2]शारीरिक शिक्षण महाविद्यालय, कोराडी.

सारांश
प्रस्तुत अध्ययनाचा उद्देश एकल व सांघिक खेळ खेळणाऱ्या खेळाडूंचे राशींच्या आधारावर व्यक्तिमत्वाचे तुलनात्मक अध्ययन करणे आहे. प्रस्तुत अध्ययनाकरिता नागपूर विद्यापीठ अंतर्गत येणाऱ्या महाविद्यालयातून ४०० पुरूष खेळाडूंची {२०० एकल खेळ व २०० सांघिक खेळ} तसेच ४०० महिला खेळाडूंची {२०० एकल खेळ व २०० सांघिक खेळ} निवड करण्यात आली. व्यक्तिमत्वाचे मापन करण्याकरिता 'आयजेंक व्यक्तिमत्व प्रश्नावली' याचे हिंदी रूपांतरण जे मेनन {१९८८} यांनी तयार केलेली आहे चा वापर करण्यात आला. सर्व खेळाडूंचे राशीच्या आधारावर वर्गीकरण करण्याकरिता त्यांच्या जन्मतारखेचा दाखला आधार म्हणून गृहित धरण्यात आला. आकडयांची गणना करण्याकरिता सांख्यिकीय पद्धती 'टी परीक्षण' चा उपयोग करण्यात आला. प्राप्त परिणामाने असे आढळून येते की, एकल व सांघिक खेळ खेळणाऱ्या खेळाडूंच्या राशींच्या आधारावर व्यक्तिमत्वात सार्थक भिन्नता आढळून येत नाही.

मानव-जीवनावर ग्रहाचे परिणाम होतात हे ज्योतिषशास्त्र सांगते.



अंकशास्त्रामध्ये प्रत्येक ग्रहाला एकेक अंक दिलेला आहे. त्याचबरोबर व्यक्ति-व्यक्तींमधील स्पंदने अजमावण्याकरिता नावाच्या स्पेलिंगमध्ये येणाऱ्या प्रत्येक अक्षरालाही १ ते ९ अंक दिले आहेत. प्रत्येकाच्या जन्मतारखेवरून, नुसत्या तारखेची एक अंकी येणारी बेरीज म्हणजे भाग्यांक असते. आणि हया भाग्यांकाशी नावातील अक्षरांना दिलेल्या अंकांची बेरीज कितपत जमते आणि जमत नसल्यास फेरफार कसे करावे लागतात याचा विचार स्वतंत्रपणे एका प्रकरणातच दिला आहे.

भाग्यांकावरून आयुष्यातील भाग्यदायी वय वर्षे, शुभ रंग-शुभ वार, प्रत्येक भाग्यांकाचे वैशिष्टय, संपूर्ण जन्मतारखेचे महत्व, आपले कुणाशी पटेल आणि कुणाशी पटणार नाही याचा भाग्यांकावरून विचार कसा करायचा, अनपेक्षित विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर पिरॅमिड पद्धतीच्या आधारे कसे शोधायचे, इ. सर्व गोष्टींचा आढावा क्रमाक्रमाने सांगितला आहे.

१ ते ९ अशा नऊ अंकांवर नवग्रहांचा , प्रत्येकी एकेका अंकावर एकेका ग्रहाचा अंमल आहे. ज्याप्रमाणे एकेका वारावर एकेका ग्रहाचे स्वामित्व आहे त्याप्रमाणे एकेका महिन्यावरदेखील एकेका ग्रहाचे स्वामित्व आहे. अंकशास्त्रानुसार एकेका महिन्यावर असलेल्या सदर ग्रहांचे स्वामित्व पाहिले असता असे लक्षात येते की, रवि ग्रहाचे दरमहा ज्या राशीतून गोचर भ्रमण असते, त्या राशीच्या स्वामी-ग्रहाचा अंमल सदर महिन्यावर असतो हे आढळते. रवीचे भ्रमण एका राशीत एक महिना असते. उदा. १४ जानेवारी रोजी मकर राशीत भ्रमण सुरू होते. मकर राशीचा स्वामी शनी ग्रह आहे. आणि म्हणून जानेवरी महिन्यावर शनीग्रहाचे स्वामित्व आहे.

राशींचे विविध फलादेश समजण्यासाठी लिंगे, आकृती, तत्व, स्वभाव, वर्ण, गुण, उदय, देह, दिशा, रंग, प्रसवता, शरीरावर अंमल यांचा फलादेशात चातुर्याने उपयोग करून घेतलेला आहे. प्रत्येक गोष्टीचा उपयोग निरनिराळया व विशिष्ट फलादेशासाठी करून घेतलेला आहे

व्यवहारामध्ये आपण तीन प्रकारच्या स्वभावाच्या व्यक्ती पाहतो. त्यामध्येही चर-स्थिर व द्विस्वभाव आढळतात. राशींमध्येही तीन प्रकारचे स्वभाव आढळतात. चर राशी, स्थिर राशी, द्विस्वभावी राशी. मेष राशीपासून अनुक्रमे चर, स्थिर व द्विस्वभावाशी तत्वे बघत जावीत. राशी बारा व स्वभाव तीन प्रकारचे म्हणून प्रत्येक स्वभावात चार राशी येतात.

{१} चर राशी- मेष, कर्क, तूळ व मकर या राशी.

{२} स्थिर राशी- वृषभ, सिंह, वृश्चिक व कुंभ या स्थिर राशी तर

{३} द्विस्वभावी राशी- मिथुन, कन्या, धनु व मीन या द्विस्वभावी राशी आहेत. या स्वभावांचे फलादेशही तसेच आहेत. चर राशी या नेहमी हलणारी प्रवृत्ती दर्शवितात. भटकी वृत्ती दर्शवितात. या राशींच्या व्यक्तींना नेहमी एका जागी बसणे आवडत नाही. चर राशी ग्रहांनी बलवान झाल्यास त्यांना

वारंवार नोकरीत, निवासात व मतांत बदल आवडतो. त्याच त्याच गोष्टींचा त्यांना कंटाळा असतो. खाण्यापिण्यातही त्यांना रोज बदल लागतो. आज महाराष्ट्रीय भोजन, उद्या गुजराथी थाळी, परवा साऊथ इंडियन, तर पंजाबी खाना वगैरे. तशी त्यांना विचारशक्तीही कमीच असते. त्या व्यक्ती थोडयाशा धाडसी व उतावळया असतात. तर चांगली नोकरी आल्यास मागचा पुढचा विचार न करता एकदम चालू नोकरी सोडून नव्या नोकरीत जातील. चर राशी या व्यूहभेदक, धडपडया, झगडणाऱ्या वृत्तीच्या, महत्वाकांक्षी व पराक्रमी असतात. चर राशी या अधिकाराला सर्वांत श्रेष्ठ व पहिल्या प्रतीच्या असतात. चर राशींच्या व्यक्ती नेहमी मोठया पदावर असतात. या राशी नियम, नियमावली कामाच्या पद्धती तयार करतात व त्यांची अंमलबजावणी करण्यासाठी हाताखालील लोकांकडे फेकतात. हाताखालील लोकांकडून काम करून घेण्याचे कार्य ते करत असतात. सर्व राजे लोक, पंतप्रधान, पुढारी प्रथम श्रेणीचे अधिकारी या राशीखाली येतात. उदा. इंदिरा गांधी, जवाहरलाल नेहरू, लो. टिळक, हिटलर वगैरे.

दोन व्यक्तीच्या व्यक्तित्वात क्वचितच साम्य आढळते. प्रत्येकाचे व्यक्तित्व वैशिष्ट्यपूर्ण असते. हे वैशिष्ट्यपूर्ण व्यक्तिमत्व निर्माण होण्यास काही घटक कारणीभूत होत असावेत. एकतर प्रत्येकाचा अनुवंश वेगवेगळा असल्याने अनुवंशाद्वारे संक्रमित होणारे व्यक्तिमत्वगुण प्रत्येकात वेगवेगळे आढळणे साहजिकच आहे. परंतु प्रत्येक व्यक्ती वर्तनाद्वारे परिवेशाशी समायोजन घडवून आणित असताना परिवेशातील कुटुंब, शाळा, समाज आणि संस्कृती यांसारख्या घटकांचा तिच्यावर परिणाम होत असतो आणि यातून तिच्या व्यक्तिमत्वाची घडण तयार होत असते.

प्रस्तुत संशोधनाचा उद्देश्य सांघिक व एकल खेळ खेळणाऱ्या खेळाडूंच्या राशीच्या आधारावर व्यक्तिमत्वाचे तुलनात्मक अभ्यास करणे आहे.

समस्येचे निराकरण करण्याकरिता सांघिक खेळ खेळणारे २०० महिला व २०० पुरूषांची निवड करण्यात आली. तसेच एकल खेळ खेळणारे २०० महिला व २०० पुरूषांची निवड देखील केली गेली. जे खेळाडू जिल्हा स्तरावर किंवा महाविद्यालयीन स्तरावर खेळलेले असतील अश्याच खेळाडूंची निवड करण्यात आली. सर्व खेळाडूंची वयोमर्यादा १८ ते २४ वर्षे असून सर्व खेळाडूंची निवड रा.तु.म. नागपूर विद्यापीठाच्या अंतर्गत येणाऱ्या महाविद्यालयातून करण्यात आली.

सांघिक व एकल खेळ खेळणाऱ्या खेळाडूंचे व्यक्तिमत्व तपासणी करण्याकरिता आयजेंक (१९६८) यांनी तयार केलेली व मेनन (१९७८) यांनी हिंदी मध्ये अनुवादित केलेली व्यक्तिमत्व परीक्षणाची निवड केली गेली. या प्रश्नावलीत मुख्यतः चार घटक - Extrovert-Introvert, Neuroticism, Psycoticism and L-Score आहेत. प्रश्नावलीत एकूण ७८ प्रश्न आहेत. त्यात २० प्रश्न Extrovert-Introvert, २० प्रश्न Neuroticism, २० प्रश्न Psycoticism आणि १८ प्रश्न L-Score चे आहेत.

प्रश्नावली निर्मात्याने सांगितल्या प्रमाणे सर्व प्रश्नावलीचे मूल्यांकन करण्यात आले. प्राप्त आकडयांचे परिक्षण करण्याकरिता सांख्यिकीय पद्धती 'टी परीक्षण' चा उपयोग करण्यात आला. प्राप्त परीणामाला सारणी क्रमांक १ येथे प्रदर्शित करण्यात आले आहे.

*सारणी क्रमांक 1*
*एकल व सांघिक खेळ खेळणाऱ्या खेळाडूंच्या बुद्धिमत्ता, खेळभावना व व्यक्तिमत्व चरांची तुलना*

| | एकल खेळ खेळणारे खेळाडू (N=400) | | सांघिक खेळ खेळणारे खेळाडू (N=400) | | Md | t | सार्थकता स्तर |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | Mean | SD | Mean | SD | | | |
| सायकोटिसिझम | 5.62 | 3.13 | 5.29 | 3.19 | .33 | 1.47 | 1.37 |
| बहिर्मुखी–अन्तर्मुखी | 11.81 | 2.86 | 11.93 | 2.64 | .11 | .59 | 1.54 |
| न्युरोटिसिझम | 7.81 | 3.48 | 7.19 | 3.73 | .62 | 2.43 | .59 |
| एल–स्कोअर | 9.13 | 2.77 | 9.49 | 2.73 | .36 | 1.84 | .005 |

't' value at .05 = 1.96 and .01= 2.57

सांघिक व एकल खेळ खेळणाऱ्या खेळाडूंच्या व्यक्तिमत्व घटक सायकोटिसिझम व बहिर्मुखी-अंतर्मुखी चरावरही सार्थक भिन्नता आढळून येत नाही. गणनेद्वारे प्राप्त 'टी' १.४७ व ०.५९ जे की सार्थक स्तरावर नाही याला प्रमाणित करण्यात सहाय्यक ठरतो. न्युरोटिसिझम चराकरिता एकल व सांघिक खेळ खेळणाऱ्या खेळाडूंची तुलना केली असता असे निदर्शनास येते की, एकल खेळ खेळणारे खेळाडू {एम-७.८१} सांघिक खेळ {एम-७.१९} खेळणाऱ्या खेळाडूंपेक्षा जास्त न्युरोटिक आढळून येतात. प्राप्त 'टी' २.४३ जो की ०.०५ च्या सार्थक स्तरावर आहे याला प्रमाणित करीत आहे. एल स्कोअर व्यक्तिमत्व घटकावर सांघिक व एकल खेळ खेळणाऱ्या दोन्ही समूहात सार्थक भिन्नता आढळून येत नाही.

वरील प्रदर्शित निष्कर्षाने असे आढळून येते की सांघिक व एकल खेळ खेळणाऱ्या महिला व पुरूष खेळाडूंत व्यक्तिमत्व चरावर सार्थक भिन्नता आढळून येत नाही.

## *संदर्भ सूची*

१}कुलकर्णी के.वि. : शैक्षणिक मानसशास्त्र, श्रीविद्या प्रकाशन ४२५-४२७, १९७७

Volume - 6 | Issue - 6 | December - 2016

२}घाणेकर मधुसूदन : जन्मतारखेतील गूढ, इंद्रायणी साहित्य प्रकाशन,
३}आंबेकर प्र.सु.: राशी ज्योतिष, चंद्रवल्लभ प्रकाशन
४}Dureha D.K.: Comparison of personality characteristics of sportsmen and non-sportsmen, NIS scientific journal, 11:2, p. 38-40, 1988.
5} Francis Leslie J, Montgomery Alice: Personality and school related attitudes among 11 to 16 year old years, personality and individual differences, vol, 14, issue 5, page 647-654, May 1993.
6}Menon D.K. et. al : “Hindi PEN inventory preliminary data on normals and psychiatric patients. Indian journal of clinical psychology a(1), 59-62, 1978.
7}Mark W. Bruner et al : Examination of birthplace and birth date in world junior ice hockey players, journal of sports sciences, vol.29, (12), 2011



डॉ. अजय करकरे
प्राचार्य, राणी लक्ष्मीबाई महिला महाविद्यालय, सांवरगांव नागपूर.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Book Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- ✶ International Scientific Journal Consortium
- ✶ OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- EBSCO
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database
- Directory Of Research Journal Indexing

Golden Research Thoughts
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.aygrt.isrj.org